# चैतन्य लहरी

जानेवारी/फेब्रुवारी २००७
अंक क्र. १/२



## कल्पनादीदी वाढदिवस समारंभ, २२ डिसेंबर २००६, प्रतिष्ठान











## अनुक्रमणिका


- श्रीमाताजी निर्मलादेवींचा संदेश, प्रतिष्ठान,१९ जानेवारी २००७ ..... २
- प्रतिष्ठान पूजा - २५ डिसेंबर २००६ , वृत्तांत ..... ३
- ख्रिसमस पूजा २००६, निर्मलनगरी भूगाव,पुणे (वृत्तांत) ..... ४
- म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान, २३ डिसेंबर २००६ (वृत्तांत) ..... ७
- कल्पनादीदी वाढदिवस समारंभ, प्रतिष्ठान,२२ डिसेंबर २००६ (वृत्तांत) ..... ८
- प.पू.श्रीमाताजींच्या सहवासातील दैवी अनुभव ..... ९
- आत्मसाक्षात्कार - मिळाल्यानंतर, प.पू.श्रीमाताजींचा उपदेश ..... ११
- लहान मुलांच्या संगोपनाच्या दृष्टिकोनातून, श्रीमाताजींनी केलेला मोलाचा उपदेश ..... १२
- श्रीमाताजींचे मार्गदर्शन ..... १९


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट,सी.डी., पुस्तके, मासिके,श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था, "**निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**" या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, **निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**. या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लिडरवर राहिल.

तसेच चैतन्य लहरी मासिकाचे सन २००७ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यांसाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.
BLDG NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,
kOTHRUD, PUNE 411 O38. TEL. 020 25286537

# श्रीमाताजी निर्मलादेवींचा संदेश

## प्रतिष्ठान, दिनांक १९ जानेवारी २००७

सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा.
नवीन वर्षाच्या निमित्ताने जगभरातील माझ्या सर्व मुलांना
माझे अनंत आशीर्वाद.
मी आपल्या सर्वांना सहजाच्या कार्यासाठी
खासकरून सहजयोगाच्या प्रचार व प्रसाराच्या कार्यासाठी
विशेष आशीर्वाद देत आहे.
निर्मल आणि सर्वांसाठी समान प्रेम आपणास
सहजाच्या कार्यासाठी प्रत्येक क्षणी यश मिळवून देईल.
अनंत आशीर्वाद.
श्रीमाताजी निर्मलादेवी.



# प्रतिष्ठान पूजा
## २५ डिसेंबर २००६
## वृत्तांत

निर्मल नगरीतील उस्तात गुलाम खानचा कार्यक्रम ऐकून २४ डिसेंबर च्या रात्री १२.०० वा सौ कल्पनादीदी प्रतिष्ठानकडे परतल्या. त्या प्रतिष्ठानमध्ये आल्या त्यावेळी २५ डिसेंबर ख्रिसमसची सुरवात होत होती.

श्रीमाताजींच्या शयनकक्षेत सौ कल्पनादीदी व उपस्थित असलेले सर्व जण जमले . त्यावेळी प्रथम श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्री पापाजींना पुष्पगुच्छ देण्यात आला. श्री माताजींच्या समोर अतिशय सुंदर असा ब्राऊन रंगाचा केक ठेवण्यात आला. श्रीमाताजींनी सर्वांच्या उपस्थितीत केक कापला. त्यानंतर ख्रिसमस गीत गाणाऱ्या विदेशी सहजयोग्यांनी श्रीमाताजींच्या समोर कॅरल गीते सादर केली . शेवटी सर्वांनी, 'नमो नमो मारिया दूताचा नमस्कार' हे भजन टाळ्यांच्या ठेक्यात गायले. त्यानंतर सर्वाना श्री माताजी, श्री पापाजी व सौ कल्पनादीदी यांनी ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या.

सर्वजण श्रीमाताजींच्या शयनकक्षेतून बाहेर हॉलमध्ये जमले. सर्वांना ख्रिसमसच्या केकचा प्रसाद वाटण्यात आला. श्रीमाताजींच्या शयनकक्षेत श्रीमाताजी व श्रीपापाजींच्या समोर सौ कल्पनादीदी बसून निर्मल नगरीत नुकत्याच झालेल्या गाण्याच्या कार्यक्रमाची माहिती सांगत असताना गाण्याचे कडवे गाऊन दाखवत होत्या. त्यावेळी हॉलमध्ये दोन भजने ऐकण्याचे त्यांचे ठरले.

त्यानंतर श्रीमाताजींचे रात्री एकच्या सुमारास शयनकक्षेतून हॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी त्यांच्या सोबत श्री पापाजी व सौ कल्पनादीदी होत्या. त्यावेळी श्री व सौ अरुण आपटे यांनी सुरवातीला, –कृपा करो श्री माँ– हे स्वत: पेटी वाजवून भजन गायले. त्यांना ढोलकीवर श्री पुगालिया यांनी साथ दिली. सदर भजन संपल्यानंतर श्री माताजींनी – ख्रिसमसचे भजन म्हणण्यास सांगितले. त्यावेळी श्रीमाताजींनी स्वत: –जगी तारक जन्मा आला– हे भजन गायला सांगितले. श्री माताजींनी सांगितलेले भजन झाल्यावर कार्यक्रम संपला त्यावेळी रात्रीचे १.३० वाजून गेले होते.

● ● ●



## ख्रिसमस पूजा
### निर्मलनगरी भूगाव,पुणे
### २४,२५,२६ डिसेंबर २००६
### (वृत्तांत)

निर्मलनगरीमध्ये ख्रिसमस पूजेसाठी २२ डिसेंबर पासूनच विदेशी सहजयोग्यांचे आगमन सुरू झाले होते. सर्व कमिटीप्रमुख एक महिन्यापासूनच तयारीला लागले होते. आपल्या स्वत:च्या जागेत होत असलेल्या ख्रिसमस पूजेमुळे सर्वांना वेगळाच आनंद वाटत होता.

**२४ डिसेंबर २००६**

सकाळी ६.०० वा. सामूहिक ध्यान झाले. त्यावेळी सकाळी १०.००वा. हवनासाठी सर्वानी एकत्र जमण्याबाबत सांगितले. सर्वजण तयार होऊन १०.०० च्या सुमारास मुख्य पेंडॉलमध्ये हवनासाठी जमले. हवनाची तयारी होत असताना म्युझिक ग्रुपने, 'तुझे नाम घेता घेता' या भजनाने सुरवात केली. त्यानंतर, 'प्रभू माझा मला जेव्हा' हे भजन सादर केले. त्यानंतर हवनासाठी सर्वांना निमंत्रित केले. हवनाची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर, 'प्रथम तुला वंदितो', 'महामाया महाकाली' ही भजने झाली. त्यानंतर श्री गणेश अथर्वशीर्ष घेतले. अग्नी देवतेचा मंत्र चार वेळा घेतल्यानंतर हवन प्रज्वलित केले. त्यानंतर श्रीमाताजींची १०८ नावे घेतली. त्यानंतर सर्व बाधांचा मंत्र घेतला. त्यानंतर पूर्णाहुती मंत्र झाला. शेवटी आरती झाली. हवन संपले त्यावेळी साधारण ११.४५ झाले होते.

त्यानंतर मुखिराम ग्रुपने, 'जय माताजी श्री माताजी', 'ऐसा दो हमे नाम', 'भरदे झोली', 'मेरी मा पुनम का चॉंद', ही भजने सादर करीत सर्वांना नाचवले. कार्यक्रम संपला तेव्हा १.०० वाजला होता.

संध्याकाळी ६.०० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात श्री धुमाळ आणि सहकारी यांच्या सनईच्या स्वरानी झाली. त्यानंतर स्टेजवर पुणे म्युझिक ग्रुपने तीन महामंत्र व स्वागत गीत गायले. त्यानंतर श्री राजेंद्र पुगालिया व श्री राजीवकुमार यांनी श्रीमाताजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.त्यानंतर श्री राजीवकुमार यांनी सर्वांचे स्वागत करून आदल्या दिवशी प्रतिष्ठानमध्ये श्रीमाताजींच्या समोर झालेल्या म्युझिक प्रोग्रामची माहिती देत श्रीमाताजींची तब्येत अतिशय चांगली असल्याचे सांगताच सर्वजणांनी प्रचंड टाळ्यांचा कडकडाट केला.

राजेश युनिव्हर्सल यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी मोहे लागी लगन माके चरणन की, सादर केले. श्री शाम जैन यांनी राग मालकंस गात निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती हे भजन सादर केले. त्यानंतर धरमशाळेच्या मुलांनी डिव्हाईन अॅसेंट ऑफ म्युझिक हे संगीत अभिनय नृत्य सादर केले. त्यामध्ये वाद्यातील हार्मोनियम मधील 'सा रे ग म नि ध सा' हे स्वर असलेले पेटीतील रचनेनुसार काळ्या व पांढऱ्या पट्टया असलेल्या मुलांनी हार्मोनियमचा सेट उभा केला होता. त्यानुसार खालीवर होत प्रत्यक्ष हार्मोनियम वाजवित असल्याचा भास निर्माण केला. त्यानंतर प्रत्येक स्वर कसा निर्माण झाला. त्या स्वराच्या उत्पतीची माहिती सादर करीत त्या त्या रागात भजनाची कडवी सादर केली. त्यावेळी त्या रागाचे प्रतीक म्हणून मोर, हत्ती ,बैल,घोडा इत्यादीचा मध्ये मध्ये वापर

करून तसेच प्रत्येक चक्रांच्या देवतेची वेषभूषा परिधान करून नाटिका सादर करताना सर्वांना चकित केले. शेवटी सहस्रार राग सादर करताना आदिशक्तीचे श्रीमाताजींचे स्वरूप दाखविले. त्यावेळी कव्वाली सादर केली.

इडा नाडी, पिंगला नाडी व सुषुम्ना नाडी बाबत नाट्यरूपाने माहिती सादर करताना संतुलन प्रस्थापित झालेल्या मुलांनी आपल्या पालकांना स्टेजवर बोलावून त्यांची कुंडलिनी जागृत करीत जगात शांततेसाठी सहजयोग प्रसार हा एकमेव मार्ग असल्याचे सूचित केले.

त्यानंतर ९.३० च्या सुमारास सौ कल्पनादीदींचे स्टेजवर आगमन झाले. त्यांचे श्री पुगालिया यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर हरिहरन व गुलाम मुस्तफा अलि खान याचे स्वागत सौ कल्पनादीदींनी केले.

श्री हरिहरन यांनी एक गझल गाऊन कार्यक्रमाची सुरवात केली. त्यानंतर गुलाम मुस्ताफा अलि खान यांनी सुरवातीला साधारण १/२ तास राग 'बागेश्वरी' सादर केला. त्यानंतर, 'गोपाला मेरी करुना क्यो नही आवे', 'राम राम सीता राम राम' ही भजने सादर केली. त्यानंतर मुस्ताफा यांच्या ऑक्रेस्ट्राचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी, 'दर्शन देदो', 'हाजी अली', 'वैश्नव जनतो', 'तेरा दिवाना हू मै', 'रघुपती राघव राजाराम', 'लाल मेरी ओ लाल मेरी' ही भजने सादर केली त्यांचा कार्यक्रम संपला त्यावेळी रात्रीचे १२.०० वाजून गेले होते. शेवटी १२.३० च्या सुमारास एन.जी.ओ.च्या ग्रुपने कव्वाली सादर केली. त्यानंतर लग्नाच्या जोड्यांची नावे जाहीर केली.

**२५ डिसेंबर २००६**

आजच्या पूजेच्या दिवसाची सुरवात सकाळच्या ६.०० च्या सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सकाळी १० च्या सुमारास सकाळच्या म्युझिक प्रोग्रामची सुरवात तीन महामंत्रांनी झाली. श्री धनंजय धुमाळ आणि सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी, 'निराकार साकार रूप में', साक्षी धुमाळ यांनी, 'आले रे गणपती घर तारी', लता धुमाळ यांनी 'जगदंबेचा जोगवा', शेवटी नवीन रचलेले भजन 'चल निर्मल नगरीत राहू' या सादर करून सर्वांची वाहवा मिळवीली.

श्री अरुण आपटे व सुरेखा आपटे यांनी मूलाधार साठी



राग 'तोडीमध्ये नार दिरदिर', 'राग शाम कल्याण मध्ये जय जय श्री शारदे', 'ब्रह्म शोधिले', शेवटी 'राग भूप मध्ये अबिर गुलाल' हे जगप्रसिद्ध भजन गाऊन सर्वत्र चैतन्यमय वातावरण निर्माण केले.

संजय तलवार यांनी, 'आज भारत शिखर पे ', 'रबानी बन रबानी बन' ही भजने सादर केली. शाम जैन यांनी, 'आया हु दरबार तुम्हारे', मधु ने 'निर्मल माऊली तु' हे भजन सादर केले. चायना ग्रुपने चायनीज भजने सादर केली. त्यानंतर आवाज उठायेंगे हे भजन सादर केले. शेवटी सुब्रमण्यम् यांनी माँ चरणोपर बसी बसी हे भजन सादर केले. सर्व गायकांचा सत्कार श्री राजीव बागडदे यांनी केला. शेवटी सर्व गायकांनी मिळून दमादम मस्त कलंदर हे भजन गात सर्वांना नाचवले. कार्यक्रम संपला तेव्हा १.०० वाजले होते.

संध्याकाळी पूजेसाठी सर्वजण दुपारी ४.०० वाजल्यापासूनच स्टेजजवळ बसले होते. आज श्रीमाताजींचे सर्वांना साकार रूपातील दर्शन होणार असल्याने सर्वजण फार आनंदात होते. स्टेज व श्रीमाताजींचा येण्याचा मार्ग फुलांनी सजविण्यात आला होता. स्टेजवर पूजेची सर्व तयारी केली होती. साधारण ६.०० च्या सुमारास तीन महामंत्रांनी सुरवात झाली. त्यानंतर गणेशमंत्र झाला. संजय तलवार यांनी, 'कैसी ये फुहार चली', पुणे म्युझिक ग्रुपने 'एक गणपती एक ईसा' भजन गायले. त्यानंतर साधारण ७.०० च्या सुमारास स्क्रीनवर श्रीमाताजींची २००१ सालची



गणपतीपुळे मधील भाषणाची सीडी दाखविण्यात आली. 'भजते रहो सदा श्री माँ का नाम' हे शाम जैन यांनी भजन म्हटले. मुखीराम यांनी 'श्री जगदंबे आई रे' हे भजन सादर केले.

सुमारे ८. ०० च्या सुमारास श्रीमाताजींचे निर्मलनगरीमध्ये आगमन झाले.त्यांच्यासोबत श्रीपापाजी व सौ कल्पनादीदी होत्या. त्यानंतर श्रीमाताजी त्यांच्या आरामकक्षात विश्रांतीसाठी थांबल्या. त्यावेळी त्यांनी थंड नसलेला कोला मागितला. त्यानंतर त्यांनी सोललेल्या हिरव्या हरबऱ्याचे दाणे आवडीने खाल्ले. श्रीमाताजी स्टेजवर आल्यानंतर पडदा दूर झाला आणि श्रीमाताजींचे साकार रूपातील दर्शनाने झालेला आनंद सेमिनारसाठी दूरदूर प्रवास करून आलेल्या सर्वांच्या चेहऱ्यावर ओसंडून जात होता. त्यावेळी स्वागतगीत चालू होते. श्रीपापाजी व सौ कल्पनादीदी स्टेजवरील आरास पाहून खूपच खूष झाले होते.

श्रीमाताजींच्या चरणपूजेसाठी मुलांना आमंत्रित केले. त्यावेळी सुरवातीला, 'बिनती सुनिये',गणेश अथर्वशीर्ष, 'जय गणेशजी की माँ अंबे', 'जागो सवेरा' ही भजने सादर होत असताना स्टेजवर येणाऱ्या प्रत्येक मुलास ख्रिसमसची लाल रंगाची टोपी घालून पाठवीत होते. श्रीमाताजींच्या चरणावर फुले वाहणारी सर्वमुले/मुली स्टेजवर फार सुंदर दिसत होती. बाजूला श्रीपापाजी व सौ कल्पनादीदी बसले होते. त्यानंतर श्रीमाताजींची ओटी भरण्यासाठी सात महिलांना स्टेजवर आमंत्रित केले. त्यावेळी श्रीमाताजींच्या चरणाला कुंकवाने सौ कल्पनादीदींनी एका विदेशी महिलेच्या मदतीने मेहंदी काढली. त्यानंतर दीदींनी श्रीमाताजींच्या पायात,हातात गळ्यात अनेक अलंकार घातले. त्यांची वेशभुषा केली. त्यानंतर श्रीमाताजींना एका लहान मुलाने मंगळसूत्र घातले. शेवटी श्रीमाताजींच्या डोक्यावर मुगुट ठेवण्यात आला. त्यानंतर सर्व सुवासिनींनी श्रीमाताजींची ओटी भरली. त्यानंतर श्रीमाताजींकडे कुंकू, पेढे, फुटाणे, मिठाई दाखविण्यात आली. त्यावेळी,'नमो नमो मारिया', 'जगी तारक जन्मा आला', व शेवटी 'विश्व वंदिता' ही भजने झाली. त्यानंतर सर्वांना श्रीमाताजींच्या पूजेतील साकार रूपाचे दर्शन झाले. सर्व जगातील लिडरांनी आरती केली.

श्रीमाताजींच्या चरणावर जगातील सहजयोग्यांच्या वतीने हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्रीमाताजींसमोर पाच थर असलेला प्रचंड मोठा केक मांडण्यात आला. श्रीमाताजींनी पापाजींच्या मदतीने प्रचंड टाळ्याच्या आवाजात केक कापला. श्री माताजींना सौ कल्पनादीदींनी केक भरविला. त्यानंतर श्रीपापाजींनी श्रीमाताजींना केक भरविला. त्यानंतर सौ कल्पनादीदींनी श्री पापाजींना केक भरविला. श्री पापाजींनी सौ कल्पनादीदींना केक भरविला. त्यानंतर वेगवेगळ्या देशांच्या प्रतिनिधींकडून आलेल्या गिफ्ट्स श्रीमाताजीना देण्यात आल्या. साधारण ११.०० च्या सुमारास आदिशक्ती श्रीमाताजींचे स्टेजवरून निवासस्थानाकडे प्रस्थान झाले.

त्यानंतर सर्वांना महाप्रसाद अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने वाटण्यात आला. सर्वजण श्रीमाताजींचे रूप डोळ्यात साठवीत आपल्या निवासाकडे निघाले. त्यानंतर लग्नाच्या जोड्यांना मेहंदी काढण्याचा कार्यक्रम सुरू झाला होता.

### २६ डिसेंबर २००६

आजच्या लग्नाच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.०० वाजता सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर १०.०० च्या सुमारास हळदीचा कार्यक्रम झाला. इकडे मुख्य हॉलमध्ये दुपारी १२ पासूनच लग्नाची तयारी सुरू झाली होती. त्यामध्ये हवनकुंड तयार करणे, हवनाचे साहित्य प्रत्येक कुंडासमोर ठेवणे, हवन कुंडाला क्रमांक देणे इत्यादी लग्नाची पूर्वतयारी सरू होती.

संध्याकाळी ५.०० च्या सुमारास सर्व वधूंना गौरी पूजनासाठी स्टेजच्या डाव्याबाजूस क्रमांकानुसार बसविण्यात आले

होते. सर्वजण स्टेजसमोर श्रीमाताजींच्या चरणांवर फुले वाहून पूजा करीत होते. दुसरीकडे सर्व नवरदेवांना बसविण्यात आले होते. त्यांना श्री नलगिरकरांनी सहजयोगातील लग्नाचे महत्त्व व पत्नीबरोबर वागण्याबाबतच्या अपेक्षा समजावून सांगितल्या. तसेच त्यांच्याकडून सर्व कायदेशीर कागदपत्रांच्या पूर्तता करून घेतल्या. त्यानंतर नवरदेवांची मिरवणूक सुरू झाली.

इकडे देव लंबोदर, जय भगवती देवी, दिन बंधु निर्मल माँ प्यारी, जो भजे निर्मल को सदा, मैया आदि मिलादे परम पार, बैठके माँ के पास माँ को देखता रहू, मेरी माँ पुनम का चांद, महामाया महाकाली, आओ जी आओ ही भजने चालू होती. ९.००च्या सुमारास श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले. त्यांच्या सोबत श्री पापाजी व सौ कल्पनादीदी होत्या. श्रीमाताजींची आरती केली त्यानंतर त्यांच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्रीमाताजींची परवानगी घेऊन लग्नाना सुरवात झाली. लग्नाच्या मंगलाष्टका श्री व सौ आपटे व श्री नलगीरकरांनी म्हटल्या. लग्न झाल्यानंतर कन्यादान सप्तपदी, मंगळसूत्र घालणे तसेच सहजयोगात लग्न झाल्यामुळे विश्वनिर्मल धर्म स्विकारल्याबद्दल शपथ, सामूहिक शपथ घेण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर सर्व जोडप्यांना श्रीमाताजींच्या हस्ते चांदीच्या वस्तू प्रेझेंट देण्यात आल्या.

त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर श्रीपापाजींनी स्पीकर धरला त्यावेळी श्रीमाताजीं म्हणाल्या, '**आज शादी हो गई। हम तरफ से, सबकी तरफ से आप लोगों को मुबारक हो। शादियाँ सबको मुबारक हो।**' श्रीमाताजीं खूप दिवसांनंतर पहिल्यांदाच स्टेजवर बोलल्या. त्यामुळे सर्वत्र वातावरण बदलून गेले. बागडदे आणि सहकारी यांनी 'मेरी माता का करम' ही कव्वाली सादर करीत असताना उपस्थित असलेले सर्वजण नाचू लागले. त्यात नवीन जोडप्यांना नाचताना श्रीमाताजी निरखून पहात होत्या. त्यानंतर श्रीमाताजी परत आपल्या निवासस्थानी गेल्या. इकडे सर्वजण रात्री २.०० वाजेपर्यंत स्टेजसमोर आनंदाने नाचत होते.

ह्यावेळच्या सेमिनारची तयारी खूप चांगली झाली होती. मुख्य म्हणजे कोलकत्याच्या कलाकारांनी केलेले स्टेजचे डेकोरेशन फारच भव्यदिव्य दिसत होते. तसेच सहजयोग्यांच्या राहण्याची, जेवणाची, पाण्याची व्यवस्था फार सुंदर केली होती. तसेच मेन रोडपासून बराचसा रस्ता डांबरी केलेला होता. सर्वत्र स्वच्छता दिसत होती.

आपल्या स्वत:च्या जागेत आयोजित केलेल्या सेमिनारला श्रीमाताजींनी सामूहिकतेमध्ये खूप वर्षांनंतर बोलून सर्वांना आशीर्वादीत केले हा या सेमिनारमधील सर्वांच्या कायम लक्षात राहणारा क्षण होता. त्या आनंदात सर्वजण आपापल्या घराकडे परतु लागले. जय श्री माताजी.

● ● ●

## म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान

### दिनांक २३ डिसेंबर २००६

प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये नॉयडा ग्रुपच्या म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. श्रीमाताजींचे रात्री ९.३०च्या सुमारास आगमन झाले. त्यांच्यासोबत श्री पापाजी व कल्पनादीदी होत्या. सुरवातीला श्रीमाताजींच्या चरणांवर हार अर्पण केला.

सुरवातीला श्री जगदंबे आई रे हे भजन सादर केले. मन भजले माँ का नाम, जागो सवेरा आया है भजन गाताना हॉलमधील महिलांनी श्री माताजींच्या समोर उत्स्फूर्तपणे नृत्य सादर केले. त्यानंतर नॉयडा ग्रुपमधील गाणाऱ्या महिलांनी नृत्य केले. त्यानंतर भोले बाबा व शेवटी मेरा कोई ना सहारा हे भजन सादर केले . आज श्रीमाताजी खूपच खूष होत्या. त्यांनी प्रथमच म्युझिक प्रोग्राममध्ये पाच भजने ऐकली.

शेवटी सर्व नॉयडा ग्रुपला श्रीमाताजींनी व श्री पापाजींनी आशीर्वाद दिले आणि श्री माताजी आपल्या शयनकक्षेत परतल्या त्यावेळी साधारण १०.३० वाजले होते.



# कल्पनादीदी वाढदिवस समारंभ

**प्रतिष्ठान**

**२२, डिसेंबर २००६**

प्रतिष्ठान मधील कव्वाली हॉलमध्ये सौ कल्पनादीदींच्या वाढदिवसाचे आयोजन केले होते. साधारण ८.०० च्या सुमारास श्रीमाताजी, श्री पापाजी व सौ कल्पनादीदींचे स्टेजवर आगमन झाले. प्रथम श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्रीपापाजींना पुष्पगुच्छ देण्यात आला. त्यानंतर टाळ्यांच्या प्रचंड गजरात सौ कल्पनादीदींना श्री पुगालिया यांनी पुष्पगुच्छ दिला.

त्यांच्यासमोर धरमशाळेच्या मुलांनी गाण्याचा व सामूहिक नाटकाचा कार्यक्रम सादर करताना सुरवातीला- इचक दाना पिचक दाना ह्या गाण्यावर अभिनय नाटिका सादर केली. त्यानंतर कठपुतली नृत्य सादर केले. शेवटी त्यांनी शेतातील बुजगावण्याचा वेष परिधान केलेल्या मुलांनी विनोदी नृत्य सादर करून सर्वांना प्रचंड हसविले.

त्यानंतर स्टेजवर केक आणण्यात आला तो श्रीमाताजींच्या समोर ठेवण्यात आला. श्रीमाताजींसोबत सौ कल्पनादीदींनी टाळ्यांच्या प्रचंड आवाजात केक कापला. त्यावेळी बाजूला धरमशाळेच्या मुलांनी खास २२ भाषेत बसविलेले हॅपी बर्थ डे म्हटले. बाहेरच्या बाजूला फटाक्याची आतषबाजी चालू होती.

सौ कल्पनादीदींना सर्व सहजयोग्यांच्या वतीने गिफ्ट देण्यात आले. दीदींनी ते श्रीमाताजी व पापाजींना दाखविले. त्यानंतर दीदींना अनेक गिफ्ट्स देण्यात आल्या. त्यानंतर श्री बागडदे आणि सहकारी यांना स्टेजवर कव्वालीसाठी आमंत्रित करण्यात आले. त्यांनी सुरवातीला 'दिलमे दिदार की आरजू है' ही कव्वाली सादर केली. त्यावेळी उपस्थित असलेले सर्वजण नाचत होते. विशेष म्हणजे धरमशाळेच्या मुलांनी स्टेजसमोर सुंदर नृत्य करून कव्वालीमध्ये रंगत आणली. त्यानंतर श्रीपापाजींनी उभे राहून श्री बागडदे आणि सहकाऱ्यांचे कौतुक केले. त्यानंतर श्रीपापाजींनी श्रीमाताजींना श्री बागडदे यांना आणखी एक कव्वाली म्हणण्यास सांगण्याबाबत विचारणा करून त्यानंतर श्री बागडदे आणि सहकाऱ्यांना स्टेजवर बोलावण्यात आले. त्यांनी, 'मेरी माता का करम' ही सर्वांची आवडती कव्वाली सादर करून सर्वांना आनंदीत केले. त्यावेळी श्रीपापाजींनी सर्वांचे कौतुक करून छोटेसे भाषण केले. त्यानंतर श्रीमाताजी व श्रीपापाजी त्यांच्या आरामकक्षात गेले.

स्टेजवर सौ कल्पनादीदींच्या समोर धरमशाळेंच्या सिनियर मुलींनी अतिशय सुंदर असे भरतनाट्य सादर केले. त्यांचे दीदींनी कौतुक केले. त्यानंतर धरमशाळेच्या सर्व मुलांना दीदींच्या हस्ते प्रेझेंट देण्यात आली. त्यानंतर सौ कल्पनादीदींनी छोटेसे भाषण केले. कार्यक्रमासाठी कव्वाली हॉल फार सुंदर सजविला होता. सर्वत्र फुग्यांच्या कमानी उभारल्या होत्या. स्टेजवर सुंदर सजावट केली होती. कव्वाली हॉलला नवीन रंगकाम केल्याचे जाणवत होते. सर्वत्र लाईटच्या माळा लावल्या होत्या. प्रत्यक्ष स्वर्गाचा भास होत होता. सौ कल्पनादीदी निघाल्या त्यावेळी रात्रीचे ११.०० वाजले होते. त्यानंतर सर्वांना महाप्रसाद देण्यात आला.

● ● ●

## Eternally Inspiring Recollections of our Holy Mother

या इंग्रजी पुस्तकात, सहजयोगी बंधू-भगिनींना प.पू.श्रीमाताजींविषयी जे काही दैवी अनुभव आले ते प्रसिद्ध केलेले आहेत. त्याच पुस्तकातून घेतलेले काही अनुभव

### I' m one with Mother

सन १९८३ च्या श्रीमाताजींच्या जन्मदिन समारंभास आम्ही भारतात आलो होतो. आम्ही तेथे एका गेस्ट हाऊसमध्ये उतरलो होतो. दिवसा संपूर्ण वेळ आम्ही श्रीमाताजींबरोबर, त्या ज्या फ्लॅटमध्ये होत्या तेथेच असायचो. सर्व कार्यक्रम आटोपल्यावर दुसऱ्या दिवशी ईस्टर संडेचा दिवस होता त्या दिवशी श्रीमाताजी, श्री राजेश शहां यांच्या फ्लॅटवर आल्या होत्या. तेथूनच त्या विमानतळावर निघणार होत्या. आम्हीही आपापल्या देशांत परतणार होतो.

त्यावेळेस श्रीमाताजींनी आम्हाला प्रत्येकाला त्यांच्या चरणकमलांचे दर्शन घेण्याची संधी दिली. आम्ही आमचे दोन्ही हात त्यांच्या चरणकमलांखाली ठेवत होतो., व चरणकमलांवर आम्ही आमचे मस्तक ठेवून नमस्कार करत होतो. एकामागून एक असा प्रत्येकाला हा आनंद मिळत होता. माझी पाळी आली तेव्हां मी असे दर्शन घेत असतांना असे अनुभवले की माझ्या डोक्यातून असा 'काडकन्' काही तरी आवाज आला. नुकताच आवाज नाही, तर मला तशी डोक्यामध्ये जाणीवही झाली.

त्यानंतर परमेश्वराशी एकरुपच झाल्याचा मी अनुभव घेतला. साक्षात परमेश्वर आपल्या बरोबरच आहे असेच वाटत राहिले.

त्यानंतर श्रीमाताजींना विमानतळावर पोहचवायला आम्ही गेलो. त्यावेळेस पहिल्यांदाच असे घडले की मला रडू फुटले नाही. नाहीतर ज्या वेळेस आम्ही श्रीमाताजींना विमानतळावर पोहचवायला जात असू त्या त्या वेळेस आपल्याकडे आता कोण बघणार? असे वाटून रडू यायचे. पण या अनुभवानंतर असे निघतांना कधीच रडू आले नाही.

श्रीमाताजी सतत माझ्या बरोबर आहेतच ही भावना दृढ झाली.

**- Ruth Flint**

### Shri Samudra Devata Sakshat

एकदा श्रीमाताजींसमवेत आम्ही समुद्रकिनाऱ्यावर उभे होतो. श्रीमाताजी खाली वाकून वाळूपासून श्रीगणेश बनवू लागल्या. कुठून तरी अचानक एक माणूस येऊन एका टोपलीतून श्रीमाताजींना फुले देऊन गेला. श्रीगणेशांची वाळूची मूर्ती श्रीमाताजींनी फुलांनी सजविली. आम्ही सर्वजण अवाक् होऊन हे सर्व पहात राहिलो. यानंतर श्रीमाताजींनी समुद्राकडे पाहिले. आम्ही सर्वजण लाटांपासून, पाण्यापासून जवळजवळ ५० मीटर दूर होतो. नंतर त्यांनी आम्हाला श्री समुद्रदेवता साक्षात हा मंत्र म्हणायला सांगितला. आम्ही सर्वजण मंत्र म्हणू लागलो, आणि खरंच, आश्चर्यजनक अशी घटना घडली.

समुद्र एका लाटेच्या स्वरुपात श्रीगणेशांचे, श्रीमाताजींचे दर्शन घ्यायला आला. फक्त १ मीटर रुंदीची एकच लाट अतिशय हळूवारपणे अगदी पुढपर्यंत येऊन श्रीगणेशांना स्नान घालून हळूवारपणे घेऊन गेली. नंतर श्रीमाताजी समुद्राच्या किनाऱ्याकडे चालत गेल्या. पाण्यात आपले चरणकमल ठेवून म्हणाल्या, मी संपूर्ण महासागरच व्हायब्रेट करते. कारण सर्व किनारपट्ट्यावर हा व्हायब्रेटेड प्रवाह पोहोचतोच.

**Bogunia Bensaude and Linda Williams**

#### श्रीमाताजींनी त्यांचे चरणकमल माझ्या कोपरावर ठेवले.

सन १९९५, साली मला जो अनुभव आला ते एक मिरॅकलच होते. हायवेवर अपघात होऊन मी बसमधून खाली पडलो. पडतांना मी माझ्या हाताच्या कोपरावर पडलो व कोपरामध्ये अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झाले. मी हॉस्पिटलमध्ये गेलो. त्यावेळी श्रीमाताजी पुण्यामध्ये श्रीसंत ज्ञानेश्वरांच्या ७ व्या जन्मशताब्दी दिनानिमित्त पुण्यात होत्या. (एम.आय.टी.) येथे त्यांचे प्रवचन होते.

त्यावेळेस श्रीमाताजींनी इतर सहजयोगींना विचारले, की प्रकाश कुठे आहे? सर्वांनी त्यांना सांगितले की, त्याचा अपघात

झाला आहे आणि तो हॉस्पिटलमध्ये आहे. त्याच्या हातावर शस्त्रक्रिया होणार आहे. श्रीमाताजींनी सांगितले की, त्याला फोन करुन सांगा की ऑपरेशन करु नको. ते लोक हाताची अवस्था आणखी खराब करू न टाकतील. त्यांच्या सांगण्यानुसार मी हॉस्पिटलमधून डिस्चार्ज घेतला. दुसऱ्या दिवशी मला प्रतिष्ठानवर बोलवण्यात आले.

श्रीमाताजींनी माझ्याकडे पाहिले. त्या माझ्यातील निगेटिव्हिटीवर ओरडत होत्या. 'तुझं काय चाललंय? त्यांनी मला जमिनीवर पडून रहायला सांगितले. माझ्या दुखावलेल्या कोपरावर त्या आपले चरण ठेवू लागल्या. मला डोळे बंद करायला सांगितले.

थोड्याच वेळात मला अतिशय हलके हलके वाटू लागले. माझे सर्व दु:ख पळून गेले होते. आता मी हात हलवू शकत होतो. त्यांनी मला हातानी काहीतरी उचलून दाखवायला सांगितले, आणि हात परत दुखू लागला. परत मला जमिनीवर पडून रहायला सांगितले. परत त्यांचे चरण माझ्या कोपरावर.आता दुसऱ्या बाजूनी ठेवू लागल्या. अक्षरश: तेथून चैतन्यलहरी माझ्या शरीरात येत आहेत ही जाणीव मी अनुभवत होतो. माझे सहस्रार पूर्ण उघडले होते. संपूर्ण शरीर चैतन्यानी भरून गेले होते. मला अगदी आकाशातील पक्ष्याप्रमाणे हलके वाटू लागले होते.

फ्रॅक्चरचे दुखणे केव्हाच नाहीसे झाले होते.

Prakash Khote

## A blessing in disguise

२३ जानेवारी,१९८८ रोजी श्रीमाताजींच्या सांगण्यावरून मी एका गणिताच्या शिक्षकांना घेऊन प्रतिष्ठानवर गेलो.(श्रीमाताजींची नात कु.आराधना हिला गणित शिकविण्यासाठी)परंतु आराधना कॉलेजमधून आली नसल्यामुळे आम्ही श्रीमाताजीं समवेत बाहेरील खोलीत बसलो होतो.

श्रीमाताजी वरती बसल्या होत्या व त्यांनी आपले चरणकमल जमिनीवर ठेवले होते. आम्ही त्यांच्यासमोरच जमिनीवर बसलो होतो. जवळजवळ १ तासभर आम्ही आराधनाची वाट पाहिली.त्यावेळेत श्रीमाताजी आमच्याशी विविध विषयांवर चर्चा करीत होत्या.

अचानकपणे मी खोकू लागलो, आणि चुकून त्यांच्या चरणकमलांवर पडलो. लगेचच उठून मी स्वत:ला सावरले. आराधनाची व आमची भेट झालीच नाही परंतु, नंतर माझ्या एक गोष्ट अशी लक्षात आली की, श्रीमाताजींच्या चरणकमलावर पडल्यापासून त्या दिवसापासून माझे छातीचे अतिशय जुनाट दुखणे कायमचे निघून गेले होते.

- R.R.Singh

## आम्ही फ्रॅक्चर सुद्धा बरे करतो

मार्च १९८५ मध्ये धरमशाळा येथे श्रीदेवी पूजा व पब्लिक प्रोग्राम होता.

एक दिवस म्युझिक प्रोग्राम व नंतर दुसऱ्या दिवशी श्री देवी पूजा. त्याच्यानंतर एक दिवसानी म्हणजे ३० मार्चला श्रीमाताजींनी आम्हांला सुचविले की जवळच एक मंदिर आहे,ते पाहून या. ते देऊळ जवळजवळ काही किलोमीटर दूर अंतरावर होते. देवळाच्या सभोवताली कृत्रिमरित्या एक तळे तयार केलेले होते. मी त्याच्यात उतरताच घसरून बाजूला जोरात पडलो. लगेचच मी स्वत:ला सावरले. व वरती- बाहेर आलो. परंतु माझ्या उजव्या मनगटाला जोरात दुखापत झाली होती.

दुसऱ्या दिवशी सभोवतालच्या गावांतील लोकांसाठी एक पब्लिक प्रोग्रॅम होता. हजारो लोक आले होते. कार्यक्रम संपता संपता श्रीमाताजींना कोणीतरी सांगितले की, माझ्या हाताला दुखापत झाली आहे म्हणून.

श्रीमाताजींनी मला लगेचच स्टेजवर बोलावले. त्यांनी मला विचारले की, काय झाले? मी घडलेली हकीगत त्यांना सांगितली व मी म्हटले की, बहुतेक मनगटाला फ्रॅक्चर झालेआहे. त्यावर त्या म्हणाल्या, फ्रॅक्चर झाले असेल म्हणून काय झाले? आम्ही फ्रॅक्चर सुद्धा बरे करतो. त्यांनी माझे मनगट जवळजवळ १० मिनिटे हातात धरून ठेवले.एकीकडे त्यांच्यासमोर रांगेत उभे असलेल्या लोकांशी त्या बोलत होत्या. १० मिनिटांनी अचानक त्यांनी माझ्याकडे बघितले व मला विचारले, आता कसं वाटतय?

खरोखरी सर्व दुखणे निघून गेले होते.मी हात हवा तसा हलवू शकत होतो. हवेत हात फिरवून दाखविला आणि सर्वजण खूश झाले. श्रीमाताजींचे आभार मानावे तेवढे थोडेच!

Deepak Midha

# २४/२५ डिसेंबर २००६, प्रतिष्ठान













# ख्रिसमस पूजा, डिसेंबर २००६













# ख्रिसमस पूजा, डिसेंबर २००६











# २३ डिसेंबर २००६, म्युझिक प्रोग्राम, प्रतिष्ठान











## The mother of miracles

१९८३ च्या ऑगस्टमध्ये मला डोळ्याला गंभीर स्वरुपाचा आजार झाला होता. डॉक्टरांनी माझ्या उजव्या डोळ्याबाबत आशा सोडून दिली होती. जेव्हा मला हॉस्पिटलमधून घरी सोडले, तेव्हां माझा उजवा डोळा हा कायमचा गेला होता. त्याचवेळी माझे काका मुंबईला जाऊन आले होते. ते म्हणाले, कुणीतरी थोर देवी आहेत, त्यांनी कर्करोगासारखे पेशंटसुद्धा बरे केले आहेत. काकांनी त्यांना मद्रासला येण्याचे आमंत्रण दिले.

१९८४ च्या ऑक्टोबरमध्ये श्रीमाताजी मद्रास येथे आल्या, त्यांनी मला बोलवले. माझ्या काकांनी माझी ओळख करू न दिली. दुसऱ्या दिवशी त्यांनी मला त्यांच्या खोलीत बोलावले. श्रीमाताजींनी मला त्यांच्यासमोर बसविले, आणि माझ्या हातात पेटती मेणबत्ती देऊन मला त्याच्या ज्योतीतून त्यांच्या हाताच्या पंजाकडे बघण्यास सांगितले. मी तेथे बसल्यावर माझे चित्त पूर्ण त्यांच्यावर एकाग्र झाले.

मला या त्रासातून पूर्ण मुक्त करा अशी मी सतत प्रार्थना करत होते. श्रीमाताजी माझ्याकडे खूप प्रेमाने पहात होत्या. त्यांनी माझ्या उजव्या डोळ्यास चैतनलहरी दिल्या. मी माझ्या डाव्या डोळ्यांनी श्रीमाताजींना पाहू शकत होते. जवळजवळ १५ मिनिटांनंतर मला दोन्ही डोळ्यांनी दिसू लागले. त्यानंतर त्यांनी हातात एक छोटा दिवा घेतला आणि माझ्या डोळ्यासमोर धरून डावीकडून उजवीकडे व उजवीकडून डावीकडे त्यांनी हळूवारपणे फिरवला. नंतर मला पाठ करून बसायला सांगितले, व मला डोक्याच्या मागील बाजूने तसेच केले माझ्या डोळ्याची लाली एव्हाना निघून गेली होती, व त्याचा आकार देखील पूर्ववत झाला होता.

श्रीमाताजींनी माझ्याकडे पाहिले आणि मंद स्मित करीत म्हणाल्या की, ' तू खूप नशीबवान आहेस, तुला माझ्याकडून असे क्लिअरिंग केले गेले.'तेव्हापासून माझ्या डोळ्याचा त्रास कायमचा गेला. खरोखरीच, श्रीमाताजींना प्रार्थना की सतत असे कृपाछत्र लाभू दे.

- kavita Mohan.

## आत्मसाक्षात्कार – मिळाल्यानंतर

(प.पू. श्रीमाताजींचा उपदेश- ॲडव्हेन्ट -१२)

१ मानवाच्या अंतरमनातील अंतर वाढविण्यासाठी देहभानाची जाणीव होऊन त्याचा अहंकार व प्रतिअहंकार हळू हळू कमी केला पाहिजे. हे सर्व कार्य पिंगला व इडा नाडीवर ताबा मिळवल्यानंतरच शक्य होते.

२ उर्जितावस्थेत कुंडलिनी देहभान विरहित शक्तीशी संबंध जोडते व त्याचाच परिणाम म्हणजे आपल्या हातातून चैतन्य – लहरी वाहू लागतात.

३ आपल्या चक्रांवरील देवता जागृत होतात. त्या देवता म्हणजे विराटाच्या आदी चक्रांच्या देवतांचे प्रतिबिंबच होते. तेच आपल्या अंतर मनातील अंतरावर निरीक्षण ठेवतात. त्यांचा व उर्जितावस्थेतील कुंडलिनीचा योग झाल्यावरच माणसाचे व्यक्तिमत्त्व संकलित होते. ह्या चक्रांच्या मुळेच आदिशक्तीच्या आज्ञा त्या व्यक्तीला समजतात. ती व्यक्ती दुसऱ्यांच्या बद्दल अंतरमनातील विचार जाणू शकते. त्यामुळेच त्या व्यक्तीची अध्यात्मिक प्रगती होते.

४ सामुदायिक देहभान मिळते. कुंडलिनीच्या उत्थानामुळे आपले चित्त अंतर्मुख होते.

५ पूर्णावस्थेतील सहजयोगी झाल्यावर, त्याच्या चक्रावरील देवता आपली जागा सोडून सहस्रारातील पीठावर आपल्या स्थानी स्थापीत होतात. नंतर त्या व्यक्तीचे पूर्णत्वाने परमेश्वराशी तादात्म्य होते.

# लहान मुलांच्या संगोपनाच्या दृष्टिकोनातून श्रीमाताजींनी केलेला मोलाचा उपदेश

## संदर्भ :- परा आधुनिक युग - विश्वशांती

चालू दशकात एकूणच मानवी नितिमत्तेला मोठी हानी पोहचलेली आहे आणि त्या जीवनमूल्यांच्या प्रचंड हानीमुळे, सर्वच कुटुंबे एकप्रकारच्या गोंधळाच्या अमलाखाली आजच्या आधुनिक जगात जगत आहेत.

सामाजिक व राजकीय शांतता सुरक्षित ठेवायची असेल तर आपला प्रत्येक प्रयत्न हा नीतिमूल्यांचे पुनर्जीवन होण्याच्या दिशेनेच असायला हवा हे अत्यंत गरजेचे आहे. आणि ह्या गोष्टीसाठी आपली सुरवातच मुळापासूनच व्हायला हवी. आपल्या मुलांची वाढ योग्य दिशेने होत आहे ना हे पाहण्यासाठी आपण मुलांकडे जास्तीत जास्त लक्ष घालायला हवे. कारण आजची मुले हे उद्याचे नागरिक बनणार आहेत. आजच्या मुलांना उद्याचा भविष्यकाळ तुम्हाला खऱ्या अर्थाने शांततामय, निरामय हवा असेल तर त्याच्या संरक्षणार्थ शस्त्रावर पैसा खर्च करून काहीच फायदा होणार नाही. तेच तुम्ही मुलांसाठी हा पैसा योग्य पद्धतीने खर्च केलात तर त्याचा अमूल्य असा फायदा जवळच्या भविष्यातल्या शांततामय व नैतिक समाजाच्या रूपाने तुम्हाला नक्कीच मिळू शकेल. सर्वात प्रथम आपण आपल्या मुलांकडे बारीक लक्ष पुरवायला हवे आणि आपण हे तेव्हाच खूप चांगल्या तऱ्हेने करू शकतो जेव्हा पालकांच्या लक्षात येईल की मुलांमध्ये आध्यात्मिकतेची आवड निर्माण करणे हे आजच्या दृष्टीने निर्णायक महत्त्वाचे आहे.

आपल्या कुटुंबातील लहान मुलांच्या प्रगतिपथावरील वाटचालीकडे विशेष लक्ष देण्याची आणि पर्यायाने मुलांची, त्यांच्या समाजाची, किंबहुना देशाची प्रगती साधायची अशी शपथच खरे म्हणजे आजच्या पालकाने घ्यायला हवी. आजच्या दृष्टीने विचार केला तर पालकांनाच त्यांच्या जबाबदाऱ्या आणि ह्या संदर्भातली आध्यात्मिक कर्तव्ये स्वत:ची स्वत: समजून घेण्याची प्रथम गरज आहे आणि त्यासाठी फ्रॉईडचे विध्वंसक तत्त्वज्ञान , एकदा कायमचे समुद्रात फेकून देऊन सुरवात करायला हवी. कॉलेज व शाळेमधून जे फ्रॉईडप्रणीत मानसशास्त्रात शिकविले जाते त्याचे अभ्यासक्रमातून उच्चाटन करून हे सहज जमू शकेल. पालकांनी आपला सुट्टीचा मोकळा वेळ पोहण्याचा पोषाख घेऊन बाहेर कुठेतरी व्यतीत करण्यापेक्षा आपल्या मुलांबरोबर घालवायला हवा. आयुष्यात गंमत तर हवीच. पण आध्यात्मिक शिस्त हवीच हवी. मुले कुठे जातात, काय करतात, केव्हा परत येतात, त्यांचे मित्र कोण ह्यावर आईवडिलांचे नियंत्रण हवे. अर्थात हे कठोरपणे न करता, अत्यंत हळूवारपणे व कुणाला कळू न देता करता येईल. मुलांशी आईवडिलांनी अत्यंत खेळीमेळीने मित्रत्वाच्या नात्याने वागालया हवे. हे घडले तर मुले ही आपला वेळ रस्त्यावर मस्ती करण्याएवजी प्रिय आईवडिलांबरोबर घालवतील. मुलांची आवड ओळखून त्यासाठी त्यांना प्रोत्साहित करायला हवे. मुलांचे साहचर्य अत्यंत निरागस आनंद मिळवून देणारे ठरते. त्यांच्याशी बोलण्यासारखी दुसरी आनंददायी गोष्ट नाही.

अक्षय नावाचा एक छोटा मुलगा होता. अपघाती पडण्यामुळे त्याचा कणा मोडला होता. सहजयोगाच्या साह्याने तो बरा झाला होता. एक दिवस मी त्याला हाक मारली आणि तो माझ्याशी गप्पा मारू लागला. त्याने मला विचारले, 'माताजी बिस्किटे कशी करतात, माहीत आहे तुम्हाला?' मी म्हटले, 'नाही रे, मला नाही माहीत', मग त्याने मला शिकवायला सुरवात केली, 'तुम्ही प्रथम तुमच्या आईला ट्रे स्वच्छ करायला सांगा. नंतर तुमच्या आईला कणकेचा गोळा बनवायला सांगा, मग तुमच्या आईला त्याचे छोटे गोळे बनवायला सांगा, मग तुम्ही ते गोळे चपटे करू शकता, मग तुमच्या आईला तो ट्रे ओव्हनमध्ये ठेवायला

सांगा, तिने हातमोजे घातले असतात. मग बिस्किटे भाजल्यावर तुम्ही आईला तो ट्रे बाहेर काढायला सांगा, आणि ती बिस्किटे जेव्हा गार होतील, तेव्हा तुम्ही एका प्लेटमध्ये ती काढा आणि मित्रांसोबत खा. मी त्याला म्हटले, 'अक्षय मला आई नाही' त्याने विचारले, 'ती कुठे गेली आहे? तिला तुम्ही बोलवा ना'. मी म्हटले, 'नाही रे, ती देवाकडे गेली आहे, ती नाही येऊ शकणार' त्याला हे ऐकून खूप वाईट वाटले. तो म्हणाला, 'अरेरे! म्हणजे तुम्हाला बिस्किटे बनवता नाही येणार, ठीक आहे. मी तुमच्यासाठी बनवीन कारण मला आई आहे ना?' दोन मित्रांमधला किती सुखद संवाद होता हा! माझ्याजवळ अशा असंख्य सुंदर गोष्टींचा प्रचंड साठा आहे. ह्या आठवणींवर मी खूप मोठे पुस्तक लिहू शकेन.

मुलाची निरागसता नष्ट करण्याचे सर्व प्रयत्न मुलांच्या आईवडिलांचे, मोठ्या निकराने, एकत्रितपणे चालूच असतात. खरं म्हणजे मुलांच्या मनात, त्यांच्या निरागस मनात नाही नाही त्या अनैतिक आणि असभ्य कल्पनांचे साम्राज्य निर्माण करणाऱ्या चित्रपट आणि कॅसेटवर सर्वप्रथम बंदी आणायला हवी. आईवडिलांनी फिल्मस आणि कॅसेट्स विरुद्ध एक मोर्चाबांधणी करायला हवी. समाजाप्रति, एकमेकांविषयी, शिक्षकांविषयी, आणि प्रत्येक मोठया व्यक्तीविषयी मुलांच्या मनात आदर निर्माण होईल असे शिक्षण द्यायला हवे. त्यातूनच देशाबद्द्ल व अखिल विश्वाबद्द्ल आदर निर्माण होईल. त्यातूनच आपल्याला अपेक्षित असलेली विश्व एकात्मता निर्माण होईल. त्यांनी विश्वकुटुंब, विश्वशांती, विश्वधर्म ह्या कल्पनांचा अगदी लहान वयातच अभ्यास करून त्या समजावून घेतल्या पाहिजेत. त्यांनी शुद्ध आणि निस्वार्थी प्रेम ह्याच आयुष्यात महत्त्वाच्या गोष्टी असतात आणि नीतिमत्ता हेच सर्वात महत्त्वाचे जीवन-मूल्य असते, पैशापेक्षाही कितीतरी महत्त्वाचे, ही गोष्ट आपल्या आईवडिलांच्या संस्कारातून शिकायला हवी. चांगली आणि वेचक पुस्तके वाचून मुलांना आयुष्यातली योग्य गोष्ट कळू शकेल. त्यांची भाषा रसाळ, आदरयुक्त व मार्दवपूर्ण असायला हवी. मानवजातीमधला एक सदस्य म्हणून त्यांना आपण उत्क्रांतीमधील एक महत्वाचे घटक आहोत आणि प्रगतिपथावरील पाऊलवाटेवर उच्च स्तरावर जाण्यासाठीच आपण ह्या पृथ्वीतलावर जन्म घेतला आहे, ह्याची स्पष्ट जाणीव असायलाच हवी.



मुलांचा अभासक्रम हा अत्यंत काळजीपूर्वक ठरविणे अत्यंत गरजेचे आहे. मुलांना स्वार्थीपणा शिकवण्या ऐवजी, 'वाटून घेणे' ह्यातला आनंद कळायलाच हवा. त्यांना जगातल्या इतर लोकांबद्दल सत्य माहिती मिळायला हवी. म्हणजेच मनात वर्णभेदाचे अथवा इतरही कुठले किल्मिष न बाळगता ते त्यांचा आदर करू शकतील. त्यांना ते ज्या समाजात रहातात, त्या समाजाचा एक चांगला भाग म्हणून ओळखले जाण्यासाठी जागृत केले पाहिजे. ह्या गोंधळलेल्या समाजात मुलांचे, निरागस मुलांचे स्थान पक्के करण्यासाठी तरुण लोकांनी वारंवार चर्चासत्र आयोजित करून चर्चा घडवून आणायला हव्यात. धर्माच्या, देवाच्या नावाखाली आपापसात भांडण करणाऱ्या कुठल्याही तथाकथित विशेष धर्मावर त्यांनी विश्वास ठेवावा ह्यासाठी त्यांना बळजबरी करण्यात येऊ नये. द्वेष आणि स्वामित्व ह्या दोन गोष्टी टाळण्याकडे त्यांची आवड कसा झुकेल ह्याबाबत प्रयत्नशील रहायला हवे. जर लहानपणापासून त्यांना असे सांगण्यात आले की तुमच्या अवतीभवतीच्या सर्व गोष्टींवर तुम्ही मालकी हक्क मिळवू शकता तर आपोआपच त्यांच्यात भयंकर अहंभाव निर्माण होईल. अगदी त्यांच्याजवळ असलेल्या निरुपयोगी खेळण्यांच्या बाबतीतही हे घडू शकते. मुलांना जी खेळणी घ्यायची तीही अत्यंत काटेकोरपणे निवडायला हवी. त्यांनी हिंसेला उत्तेजन द्यावे अथवा हिंसेचे

उदात्तीकरण होईल असे खेळणे नसावे किंवा हिंसा हा त्यांच्यासाठी कथाविषय म्हणून पण देऊ नये. मुलांना फक्त खूप सुंदर आणि रचनात्मक खेळणी हाताळू द्यावीत. ज्या योगे रचनेतला, निर्मितीतला आनंद ते समजू शकतील. भूतकाळातल्या किंवा वर्तमानकाळातल्या भयानक प्राण्यांची अत्यंत कुरूप पद्धतीने बनवलेली खेळणी मुलांना कधीच देवू नयेत. मी तर म्हणेन, ती विकूही नयेत, खरोखर अशा खेळण्यांवर बंदीच आणालया हवी. जर काही चांगली खेळणी बनवली गेली, आणि ह्या घाणेरड्या,कुरूप खेळण्यावर बंदी आणली तर मला खात्री आहे मुलांमध्ये सुंदर आणि रचनात्मक खेळण्याची आवड नक्कीच वाढीस लागेल. जेव्हा माझ्या मुली लहान होत्या, तेव्हा रामायण, महाभारत, गीता किंवा बायबलवर बनविले गेलेले चित्रपट पहाण्यास मी त्यांच्यावर सक्ती करीत असे. आपोआपच अशा तऱ्हेचे चित्रपटच पाहण्यात त्यांना आश्चर्यकारकरीत्या गोडी वाटू लागली. इतकी की मी एकदा मुलींना माहेरी आईकडे पाठविले असताना माझ्या बहिणीने मला पत्रात लिहिले की तुझ्या मुली ज्याची कथा पुराणांवर आधारित नाही, किंवा, पारंपारिक नाही असे चित्रपट पहायला यायला तयारच होत नाहीत. आता माझ्या मुली मोठ्या झाल्या आहेत, इतरांपेक्षा त्या खूप वेगळ्या आहेत. हा चांगले चित्रपट पहाण्याची आवड निर्माण करण्याचा एकमेव मार्ग आहे.

मुलांना, कुरूप, बिभत्स चित्रपट पहायला मूळात आवडत नाही. माझ्या अनुभवाप्रमाणे, माझ्या असे लक्षात आले आहे की मुले मुळातच शुद्ध आणि निरागसच असतात. अर्थात मुलाच्या वेळेस आईस दिवस असताना जर आईवडील सतत भांडत राहिले तर त्याचा दूरगामी परिणाम मुलांवर होतो. पालकांचा मुलांशी संपूर्ण सहयोग असायला हवा, त्यांनी मुलांबरोबर जास्तीत जास्त वेळ घालवायला हवा. आणि त्यांच्याशी अत्यंत प्रेमाने,हळूवारपणे बोलायला हवे. मुलांच्या देखत एकमेकांशी भांडून वेळ घालविण्यापेक्षा आपला वेळ मुलांबरोबर घरात बोलून घालविला पाहिजे. त्यांना आपला सहवास द्यायला हवा. तसे केले तर ती खूप चांगली मुले होतील, समाजाची संपत्ती म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाईल.

जेव्हा पालक मुलांना घेऊन कुठे बाहेर जातील तेव्हा त्यांना कुठल्याही असभ्य जागेवर नेवू नये. मुले आपल्यामध्ये



चांगले अथवा वाईट फार पटकन टिपून घेतात. ते मग पटकन जुगार खेळायला शिकतात. मला अशी काही मुले ठाऊक आहेत की ती कोणत्याही गोष्टीवर पटकन पैज लावतात व आपापसात मारामारी करतात. दुसऱ्या बाजूला जी मुले आईवडिलांनी खूप प्रेमाने आणि काळजीपूर्वक वाढविली असतात ती मुले खूप गोड, अगदी चॉकलेटसारखी मिठठास बनतात. आपोआपच अशी मुले आपली मालकी हक्काची भावना,सारे काही फक्त आपल्यालाच मिळावे असा हावरेपणा हळूहळू विसरू लागतात. अमेरिकेत आमच्या शाळेत दोन मुले होती. ती दिवसेंदिवस क्षीण होत आहेत असे माझ्या लक्षात आले त्याचे कारण मी शाळेतल्या शिक्षकांना विचारताच, त्यांना मॅकेडोनाल्ड बर्गर सारख्या गोष्टी खायला हव्या असतात आणि आपल्या शाळेकडे असलेल्या गोष्टी पुरवण्याची व्यवस्था नाही. अर्थात नंतर हळूहळू त्या मुलांची आवड बदलली आणि त्यांना घरी केलेले पौष्टिक पदार्थ आवडू लागले. पुढच्या वर्षी ते परत आपल्या घरी गेले तेव्हा हे सर्व पाहून त्यांच्या पालकांना आश्चर्यच वाटले, ते तेव्हा म्हणत, 'चला, आपण मॅकडोनाल्ड्सला जाऊ या' मुले म्हणत, 'नको आम्हाला आवडत नाही. आम्हाला कुठल्याच फास्टफुडच्या दुकानात जायचे नाही. जे काही घरात बनवले असेल तेच आम्ही खाऊ' मुलांमध्ये झालेला हा बदल पाहून आईवडील खूपच सुखावले. आपला आनंद आणि प्रेम


व्यक्त करण्यासाठी ते मुलांना म्हणाले, 'जेव्हा तुम्ही परत शाळेत जाल तेव्हा तुमच्या आवडीची काहीतरी वस्तू आम्ही तुम्हाला देऊ इच्छितो' मुलांनी थोडासा विचार केला आणि म्हणाले, 'शाळेतल्या आमच्या मित्रांना दाखविण्यासाठी तुमचे फोटो आम्हाला हवेत.' ही मुले खूपच गोड आहेत. आता ती वर्गात अभ्यासही चांगला करतात. त्यांचे वजनही आता व्यवस्थित झाले आहे.

माझ्या असे ध्यानात आले आहे की घर जर स्वच्छ , आणि नीटनेटके असेल व घरसजावटीकडे अत्यंत आपुलकीने पाहिले गेले असेल तर मुले ते अस्ताव्यस्त करत नाहीत. त्यांनाही तसेच स्वच्छ घर ठेवायला आवडते.

मला आठवते, माझी नात माझ्याकडे आली होती. तिने कारपेटावरचा डाग स्वच्छ करायला सुरवात केली. साधारणत: इंग्लंडमध्ये लोक कारपेटच्या स्वच्छतेबाबत खूप काळजी घेतात. त्यांना ते सहजपणे नंतर विकून टाकता येते. तर मी सांगत होते की माझी ही छोटीशी नात सुमारे तासभर तरी त्या कारपेटची स्वच्छता करत होती. शेवटी मी म्हटले, 'अग! तू कशाला करत बसली आहेस हे, नंतर ते स्वच्छ करवून घेता येईल ना'. त्यावर ती म्हणाली, 'नाही ग, आजी, तुझे घर इतके सुंदर आणि स्वच्छ आहे की या डागाने मला ते कुरूप बघवत नाही. मला तिच्या समजूतदारपणाचे, आणि जबाबदारीचे, आणि जबाबदारीने वागण्याचे मला आश्चर्य वाटले. जर मुलांना सुंदर स्वच्छ व नीटनेटके घर ठेवण्याची जबाबदारी टाकली तर ती जबाबदारी ते नक्कीच पार पाडतात. भारतामध्ये ही गोष्ट खूप चांगल्या तऱ्हेने केली जाते. आणि मुले आपोआप खूप लवकर रचनात्मक, कलात्मक, सुंदर आणि त्यांना जीवनांचा संदेश देणाऱ्या गोष्टी करायला शिकतात. ह्याच पद्धतीने आपण त्यांच्या भावभावनांचा खोलवर विकास घडवून आणू शकतो. मुलांनी आईवडिलांकडे जन्म घेतला असतो ते काही झाडावरून पडलेले नसतात. मग त्यांच्या आयुष्याला आकार देण्याचे काम कोण करणार? शिक्षक देखील खूप चांगल्या तऱ्हेने हे काम करू शकतात.

ह्या उलट काही वेळेस आपल्या आईवडिलांचे अथवा शिक्षकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यासाठी ही मुले आपल्या काही कल्पनांचा विकृत वापर करून हिंसक बनतात.

पाश्चिमात्य देशातल्या शाळेत लैंगिक शिक्षणावर जरा



जास्तच, अवाजवी भर दिला जातो. अगदी लहान मुलांनाही हे शिक्षण दिले जाते. ह्यामुळे होते काय की अर्धपक्व मनात ह्या लैंगिकतेबद्दल उत्सुकता निर्माण होते व परिणामत: लैंगिकतेवर आधारलेल्या सर्व प्रकारच्या समस्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊ शकतात. मुलांची मने ओल्या मातीसारखी असतात. त्यांना खूप चांगल्या तऱ्हेने सुंदर आकार देता येतो. पण तेच ह्या मुलांना निष्काळजीपणाने हाताळले तर आकारच बिघडला जातो. शिक्षकांनी मुलांना प्रेम ह्या शब्दाचा खरा अर्थ जाणून घेण्याचे शिकवले पाहिजे. समाजाला कसे उपयोगी पडले पाहिजे, हे शिकवले पाहिजे. त्यांनी कसे दयाळू व्हायला हवे आणि बरबटलेल्या वासनेपासून कसे मुक्त व्हायचे हे शिकवले पाहिजे. मुलांनी आयुष्यात सर्व प्रथम हा धडा गिरवायला हवा.

गणित आणि व्याकरणासारखे विषय सहजतेने समजून घेता येतात. पण शिक्षकांनी आपल्या उच्च विचारसरणींनी आणि दुसरे म्हणजे विद्वान लेखकांनी लिहिलेल्या चांगल्या पुस्तकांच्या साह्याने मुलांमध्ये ह्या गोष्टी कशा निर्माण होतील ह्याचा विचार प्रथम करावयास हवा. त्याचबरोबर एखाद्या व्यक्तीत हे गुण नसतील तर त्याला आयुष्यात किती त्रास होतो हे-देखील ह्या पुस्तकांच्या द्वारे त्यांना कळू शकेल.

भारतामध्ये जेव्हा लोक जेवायला एकत्र बसतात, तेव्हा टेबलवर मीठ अथवा मिठाचे भांडे एकमेकांच्या हातात देत नाहीत, कारण तसे केल्यास भांडण होते अशी एक समज आहे. ह्या

गोष्टीपासून एकच धडा घ्यावयाचा की, अशी कोणतीही गोष्ट करावयाची नाही की जी भांडणाला प्रवृत्त करेल. ह्यात आपण कुणाशीही भांडू नये ही भावना मनात येणे महत्त्वाचे आहे. कारण कुणी कुणाशी भांडणे हे मानव प्रतिष्ठेला मुळीच शोभत नाही. मुलांना ही गोष्ट स्पष्ट समजायला हवी की,जगाच्या उत्क्रांतीमध्ये मानव हा त्या उत्क्रांतीचा अर्क आहे. त्यांनी हेही लक्षात घ्यायला हवे की, एकमेकांना खूष करीत एकमेकांशी शांततेने आणि मित्रत्वाच्या नात्याने रहायला हवे. आपण जनावरासारखे नाही आहोत, तसे वागूच शकत नाही. एकमेकांना आनंद देणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे आणि सर्व शक्य पद्धतीनी मुलांना हे शिकवायला हवे. भांडण टाळणे ही आपल्या व्यक्तिमत्त्वातील कमजोरी नाही ह्याची स्पष्ट जाणीव मुलांना होणे गरजेचे आहे. एकमेकांशी आनंदाने आणि शांततेने वागणे ही केवढी दैदीप्यमान गोष्ट आहे. विसरणे,क्षमा करणे हाच खरा पुरुषार्थ आहे ह्या पुरुषार्थाचा आनंद एकदा का मुलांना कळला की इतर फालतू गोष्टीपासून ते दूरच राहतील.

काही वर्षापूर्वी भारतात, काही आंग्लाळल्या लोकांनी खास युवा पिढीसाठी एक वर्तमान पत्र काढले होते. त्यात आपण आपले आयुष्य तारुण्य, प्रौढत्वाबाबत आधुनिक संकल्पना मांडली होती. तर ते लोक माझ्या मोठ्या मुलीस भेटण्यास आले.त्या वेळेस ती फक्त १३ वर्षाची होती. त्यांना तिला एकटीला भेटायचे होते. त्यांनी तिला खूपच चमत्कारीक प्रश्न विचारले. त्यांच्यापैकी एकाने विचारले तुला बॉयफ्रेंड आहे? तिने उत्तर दिले मला खूप मैत्रिणी आहेत आणि खूप भाऊ आहेत. भारतात 'कझीन्स' हा शब्द खूपच व्यापक अर्थाने वापरला जातो. त्यांचा पुढचा प्रश्न होता, 'एखाद्या पक्ष्यासारखे तुला आकाशात स्वैर संचार करायला आवडेल?' तिने उत्तर दिले, 'प्रथम माझ्या पंखाची वाढ तर नीट होऊ दे.' मग आईवर हल्ला चढवीत ते म्हणाले, 'ती तुझ्यावर कडक नियंत्रण ठेवते?' मुलीने उत्तर दिले, 'माझी आई माझ्यावर प्रेम करते'. माझ्यासाठी काय चांगले, वाईट आहे ते तिला खूप चांगले माहीत आहे. मी तिला नाखूष करणारी कोणतीही गोष्ट कधी करणार नाही.

मुलांमध्ये इतक्या सबळ प्रमाणात स्वाभिमान एकत्र झाला पाहिजे की त्यांनी एखाद्या गोष्टीची मागणी करणे, अथवा ती गोष्ट



मिळवण्यासाठी भांडणे ही गोष्ट अजिबात करता कामा नये, त्यांना स्वाभिमानी लोकांच्या गोष्टी सांगून, त्यांच्याशी वारंवार बोलून ही गोष्ट करता येईल. एकदा आम्ही ब्रिटनमध्ये गेलो होतो. माझ्या दोन नाती आमच्याबरोबर होत्या. त्या दोघी चिमुकल्या रेल्वेतून विहार करीत होत्या. त्या परत आल्या, पण छोटीला परत तिथेच जायचे होते. ती रडू लागली. एकाएकी तिला जाणवले आपण हे काय करत आहोत. तिचा स्वत:बद्दलचा अभिमान एकदम जागा झाला. तिने आपला चेहरा झाकला आणि ती सारखी, 'मला माफ कर आजी, माफ कर, असे म्हणू लागली. मी तिला म्हटले, 'तू तुझा चेहरा का लपवीत आहेस?' ती उत्तरली 'मी ज्या पद्धतीने वागले त्याची मला खूप लाज वाटते. मुले आपल्या निरागसतेचे, परिपक्वतेत खूप चांगले परिवर्तन करू शकतात. अर्थात त्यासाठी आपण त्यांच्यात योग्य दृष्टिकोन आणि स्वाभिमान ह्याचा विकास होईल अशी संधी त्यांना दिली पाहिजे. त्यांच्या पुरुषार्थाला, व पराक्रमाला सकारात्मक जादा कुमक देऊन त्यांच्या छोट्या छोट्या ध्येयाला खतपाणी घालून, आपण त्यांना, चांगल्याचे नेहमी कौतुक केले पाहिजे ही गोष्ट शिकवायला हवी.

माझ्या दुसऱ्या मुलीच्या संदर्भात माझ्याजवळ एक खूप चांगली आठवण आहे. ती मुंबई विद्यापीठात एम.ए. च्या पहिल्या वर्षात शिकत होती. ती एका पाश्चिमात्य पद्धतीच्या कॉलेजमध्ये जात होती. एक दिवस मी तीला विचारले, 'तू आता पुरेशी मोठी झाली आहेस. तुझा निर्णय तू घेऊ शकतेस.' नंतर तिने विचारले, 'आई तू स्लीव्हलेस ब्लाऊज का घालत नाहीस?' मी

म्हटले, 'एकतर मी माझे खांदे उघडे टाकले तर मला वेदना होतील, शिवाय मी बरीच जुन्या विचारांची,पारंपारिक आहे' तिने क्षणभर विचार केला, तिच्या लक्षात आले की ह्यामागे काहीतरी महत्त्वाचे कारण असावे. मग मला तिला सांगावेच लागले की आपल्या शरीरातील दोन महत्त्वाची चक्रे ह्या खांद्यापासच्या सांधेजोडीत असतात. त्याला श्रीचक्र आणि श्रीललिता चक्र असे म्हणतात आणि ही चक्रे झाकून ठेवणेच योग्य असते. तिला हे ऐकून काहीसा धक्का बसला. मग ती मला म्हणाली,' आई जे चुकीचे आहे ते करावयास तू मला का परवानगी दिलीस. तू माझी आई आहेस. माझ्यापेक्षा जास्त हुषार आहेस. तू मला फक्त 'नाही' म्हणायला हवे होतेस आणि माझ्या त्या चक्रांचे संरक्षण करावयास हवे होते.



मुलांसाठी तयार करण्यात येणारे चित्रपट एकतर पालकांनी स्वत: बनविले पाहिजेत. स्वत: एक पालक कमिटी नेमून ते बघून त्यावर निर्णय दिले पाहिजेत. आणि जे चित्रपट मुलांनी पाहू नयेत असे असतात ते टी.व्ही. वर रात्री ९.०० नंतर दाखविण्यात यावेत. जेव्हा मुलांनी गाढ झोपेत असावे, अशी अपेक्षा आहे. भयंकर प्राणी, दुराचारी, मृतशरीरे भूतपिशाच्च ह्या प्रकारच्या मुलांना भिववणाऱ्या गोष्टी ज्या चित्रपटात असतील ते मुळीच दाखविण्यात येऊ नयेत. अशा नाजूक वयात एकदा का ते घाबरले की आयुष्यभर ही धास्तीची भावना ते मनात बाळगतात. अनेकदा मुलांना आपण झाडाची, चंद्राची, कुत्र्याची भीती दाखवितो. मुलांना भीतिदायक गोष्टी सांगणाऱ्या लोकांकडून अशा प्रकारची भीती मनात खोलवर दडून बसते आणि अत्यंत चिवट असते. अथक आणि सतत प्रयत्नांनंतरच मुलांच्या मनावरचा हा भीतीचा पडदा दूर करता येतो व त्यांना सांगितल्या गेलेल्या भीतिदायक गोष्टी काल्पनिक असतात हे त्यांच्या मनावर ठसविता येते.

माझ्या असे लक्षात आले आहे की कॅन्सरसारख्या रोगांच्या अनेक कारणांपैकी,लहान वयातच मुलांच्या मनात निर्माण झालेली भीती हे एक महत्त्वाचे कारण ठरू शकते. काही वेळेस ही भीती त्यांना खूप वेगळ्या तऱ्हेचे वर्तन करण्यास भाग पाडते. ज्यांना ते घाबरतात त्यांना नष्ट करण्यासाठी बरबाद करण्यासाठी ती अनेक युक्त्या वापरताना दिसतात.

जे लोक विवाहित असतात त्यांना आपण विवाहबंधन का स्वीकारले आहे, ह्याची पूर्ण जाणीव असावी. जर त्यांना मुले हवी असतील तर त्यांना आपल्याला ती का हवी आहेत ह्याची पूर्ण कल्पना असावी. विवाहितांसाठी निर्माण केलेला कायदाच असा असावा की खूप चांगल्या गोष्टीत ते एकमेकांशी प्रामाणिक राहतील की, ज्यामुळे सुखी वैवाहिक आयुष्याची त्यांची स्वप्ने पुरी होतील. अशी अनेक जोडपी आहेत की जी लग्न न करता एकत्र रहातात. अर्थात जे जास्त करुन पश्चिमेकडेच घडते. आणि असे लोक जेव्हा लग्न करतात तेव्हा मात्र ते एकमेकांपासून काहीसे दुरावतात. महत्त्वाचे कारण असे की जर त्यांनी घटस्फोट घेतला तर त्यांची संपत्ती अर्ध्यात वाटावी लागेल.तसेच घराचेही दोन भाग करावे लागतील. ह्याच गोष्टीला घाबरतात. मी अमेरिकेसारख्या देशात अशा अनेक स्त्रिया पाहिल्या आहेत की ज्या एखाद्या राणीसारख्या रहातात. कारण १०-१० घटस्फोट घेऊन प्रत्येक नवऱ्याकडून त्यांनी अफाट संपत्ती मिळवली असते आणि बहुतेकींचे माजी पती कंगाल होऊन भिकेला लागलेले असतात. संरक्षणाच्या नावाखाली स्त्रियांना जास्त हक्क मिळणे हा अशा देशात एक रोगच झाला आहे. साहजिकच ह्या स्त्रिया लग्नाकडे एक धंदा म्हणून पहातात. पुरुषांनी ह्या स्त्रियांपासून आम्हाला वाचवा अशी हाकाटी करण्याची आता वेळ आली आहे. हा कायदा काही वर्षापूर्वीपर्यंत ठीक होता. पण आता तो अत्यंत धोकादायक झाला आहे. आणि घटस्फोटाकडे केवळ पैसे मिळवण्याचे धन मानणारा हा कायदा आता बदलायची वेळ आली आहे.

आजकाल जे चित्रपट बनवले जातात ते सध्याच्या काळात

जसे बनविले पाहिजेत त्याच्या जवळपासही न पोहचणारे आहेत. पहिली गोष्ट, जर ते अमेरिकन चित्रपट असतील तर अमेरिकन लोकांखेरीज इतर कुणालाही त्यांची भाषा समजत नाही. जर ते इंग्लिश असतील तर ब्रिटनमधल्या लोकांखेरीज ते कुणाला कळत नाहीत. जुन्या काळात इंग्लिश चित्रपटातील उच्चार अतिशय स्पष्ट असत. पण आता चित्र पालटले आहे. आता इंग्रजीचा उच्चार अमेरिकन पद्धतीने केला जातो. दूरदर्शनवरचे वृत्तनिवेदक देखील ते वापरत असलेल्या शब्दांच्या उच्चाराबाबत बेफिकीर असतात. त्यांना फक्त घाई आणि वेग ह्याचीच जणू काळजी असते. उलट दुसरीकडे जे लोक ब्रिटन किंवा अमेरिका सोडून भारतात अथवा जपानमध्ये, हाँगकाँगमध्ये मध्ये वास्तव्यास गेले आहेत, त्यांची भाषा जे लोक इंग्लंड, अमेरिकेत राहतात, त्यांच्यापेक्षा चांगली आहे असे म्हणावे लागते.



सध्याचे चित्रपट हे किळसवाण्या लैंगिकतेवर आणि भयानक हिंसाचाराने भरलेले असतात. ही त्यांच्याबद्दलची सर्वात अस्वस्थ करणारी गोष्ट आहे. त्या चित्रपटांना कथा नसते, त्यात काही घटना घडत नाहीत. जणू काही प्रत्येक चित्रपटातही आंतरिक मूल्य असलेलाच चित्रपट बनेल एवढी निर्मितिक्षमता असलेले चांगले लेखक आता शिल्लकच नाहीत.अर्थातच ह्या चित्रपटांचा अत्यंत वाईट परिणाम समाजावर होतो. विशेषत: समाजातल्या युवा पिढीवर ! खरं म्हणजे ह्या चित्रपटांवर खूप आदर्शवादी लोकांचे नियंत्रण हवे. प्रत्येक चित्रपटाचे तोलून मापून परीक्षण होणे गरजेचे आहे. आणि अर्थातच त्यासाठी काही कडक कायदेकानून आणि मानदंड असणे आवश्यक आहे. आजचे बरेचसे चित्रपट कलात्मक नसतात. उलट, त्यापैकी बरेचसे हास्यास्पद आणि असभ्य असतात. त्यांच्यावर कोणत्याही नियंत्रणाचा परिणाम न होता त्यांचा प्रवास वाईटाकडून अधिक वाईटाकडे चालू आहे. खरं म्हणजे निरीक्षण मंडळावर चांगल्या, आदर्श नितिमत्तेची जाण असलेले आणि त्यानुसार चित्रपटात सुधारणा करू शकणारे लोक असणे आवश्यक आहे. विशेषत: बाल चित्रपट खूपच काळजीपूर्वक पाहून ते पास केले पाहिजेत. असे चित्रपट मुलांना नीतिमत्ता आणि दयाळूपणा शिकवण्याचा ध्येयाने प्रेरित होऊनच निर्माण व्हायला हवेत. शिक्षण विषयक धोरणही असेच हवे. चित्रपटात पैशापेक्षा संस्कृतीचा विचार जास्त व्हावा.तसेच मुलांना चांगली पुस्तके वाचण्याचे प्रोत्साहन द्यावे. ही पुस्तके जगातल्या चांगल्या लेखकांकडून लिहिलेली असावीत. त्यांचे वाचन फक्त देशापुरते सीमित राहू नये. त्यातही केवळ कविकल्पनेवर आधारलेल्या विज्ञान काल्पनिकता किंवा कामुक कहाण्यांपेक्षा लोकोत्तर पुरुषांची चरित्रे, आत्मचरित्रे ह्यासारखी पुस्तके वाचण्याची आवड असावी.जर तुम्ही त्यांच्यापुढे भयानक नायकांची वर्णन करणारी पुस्तके ठेवलीत तर त्या दुष्ट लोकांचे अवगुण ही मुले चटकन आत्मसात करतील. थोड्या मोठ्या मुलांसाठी भ्रष्ट, अनैतिकता, किती भयावह असते आणि तिच्यामुळे जीवन कसे उद्‌ध्वस्त होते हे दाखवून देणाऱ्या कथा, कादंबऱ्यांची निर्मिती व्हावी.

मुलांना मुक्त स्वातंत्र्य देण्याची संकल्पना देखील अतिशय भयावह, धोकादायक आहे. पूर्ण स्वातंत्र्याची कल्पना तेव्हाच उपकारक ठरेल जेव्हा स्वातंत्र्य ह्या शब्दाचा पुरा आणि खराअर्थ समजण्याइतकी मुले हुषार आणि परिपक्व झाली असतील.

● ● ●

# श्रीमाताजींचे मार्गदर्शन

## (प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचा उपदेश निर्मल युग व १९८३ ख. १३ पा. २३)

१ आपणास चैतन्य लहरी जाणवतात. ते दुसरे तिसरे काही नसून प्रेमाचे प्रतीक आहे. त्याचा मार्ग आपण देवळाला प्रदक्षिणा घालतो त्या प्रमाणे असतो. ते प्रतीक आपणास जाणवते व हळू हळू मालवते. शक्तीचे आगमन व प्रयाण प्रदक्षिणा सारखेच असते.

२ मी आदिशक्ती आहे म्हणून मला ते सर्व माहीत आहे.

३ बऱ्याच लोकांना अहंकाराची भीती वाटते. पण तो तुम्हास हवा. तुम्ही तुमच्या अहंकाराशी झगडू शकत नाही. परंतु अहंकार व परमात्मा एकारूपातच पहाण्याची सवय ठेवा. आपण परमेश्वराशी एकरूपता मिळवा म्हणजे झाले. हे जरी सहज शक्य असले तरी ते तुम्ही करू शकत नाही. म्हणून माझे अस्तित्व आहे.

४ माझा फोटो म्हणजे सत्यस्थितीचे प्रतीक आहे. मी जे बोलते ते कृतीत आणते त्यालाच आपण प्रणव दर्शन म्हणतो व ते तसे असतेही.माझे बोलणे म्हणजे माझ्या मुखातून मंत्रोच्चार होत असतो.

५ आपण धंद्यात दुसरा सहजयोगी भागीदार घेऊ नका.

६ आपण सहजयोगाचा उपयोग पैसा कमवण्याकरीता करू नका. तुम्ही उदार चरित्र सांभाळा. आपण सत्यवचनी व्हावयास हवे. आपण अंत:करणातून समाधानी रहावयास हवे.

७ आपण आचरणांत शीलाला महत्त्व दिले पाहिजे. आपली दृष्टी शीलाकडेच वळली पाहिजे. त्यामुळे तुमचा दृष्टिकोण बदलेल. त्याप्रमाणे तुम्ही तुमचे मित्रमंडळ बदलाल. तुम्हास घाणेरडे विनोद आवडणार नाही. आपण सभ्य गृहस्थ म्हणून वावरले पाहिजे.

८ आपण कंजुष राहता उपयोगी नाही.सर्व कंजुष लोक हे सहजयोगाच्या विरुद्ध असतात. असे कंजुष लोक माझ्याकडे आले तर मी त्यांना त्रास देते.आपण जर कंजुष असाल तर आपणास भयंकर त्रास होईल.

९ आपण बडबडे नसावे. आपण जर बडबडे व त्रासदायक असाल तर मी तुमची बडबड थांबवेन. आपण जर न बोलणारे असाल तर ते चालावयाचे नाही. त्याचा अर्थ असा, की आपण टोकाची भूमिका घेऊ नये.

१० मानसिक उदारता ही फार आल्हाददायक असते व त्यामुळेच जनता आकृष्ट होते. ही उदारता माणसात वासक रीत असते व कुंडलिनीमुळे ती जागृत होते. परंतु कृत्रिम वातावरणांत वावरणाऱ्या लोकांना त्याची काही मजा लुटता येत नाही. जरी कुंडलिनीने ब्रह्मरंद्र छेदले असले तरी तिने हृदयांतून वर जावयास हवे. परंतु काही सहजयोग्यांचे हृदय अगदी दगडासारखे असते व त्यात प्रेमाचा लवलेशही असत नाही. ते दुसऱ्याशी बोलताना तुच्छता दर्शवितात व आपण एक फार मोठी व्यक्ती आहोत असे दर्शवितात. बऱ्याच वेळा मी पाहिले, की जनता एकमेकांना धक्का बुक्की करतात व एकमेकांवर माझ्यासमोर ओरडतात. बालकावर ते जेव्हा ओरडतात तेव्हा माझ्या हृदयाला पीळ पडतो. खरे म्हणजे सहजयोग्यांनी परस्परांवर प्रेम करावे. आपण एकाच आईची लेकरे असताना आपण असा दुजाभाव का ठेवावा? आपण पूर्ण आहांत का? आपल्यात काही दोष नाहीत का? आपण फक्त जागतिक प्रेमाबद्दल बोलतो. आपण ह्या युगांत मानवावर प्रेम करावयास शिकलो नाही तर कोणत्या युगांत करणार?मला एकच सांगावेसे वाटते, की आपण आपल्या मनातील दुसऱ्या सहजयोग्याबद्दलची विषारी वृत्ती बदलावयास हवी.एखादा सहजयोगी आपल्या गांवी येणार असेल तर त्याला आमंत्रण द्या व त्याची चांगली भावासारखी देखभाल ठेवा. त्याच्या आनंदीवृत्तीमुळे तुमचे घर पवित्र होऊन जाईल.मला समजत नाही, की सहजयोग्यामध्ये निरनिराळे गट कसे असू शकतात? कारण तुम्ही तुमची बंधने प्रतिक्षणी सुधारतात. सर्वांनी हे लक्षांत ठेवले पाहिजे, की सहजयोग्यात गटबाजी करणे अगदी धोकेदायक बाब आहे. आपण दुसऱ्याच्या गुणवत्तेकडे बघावयास हवे व त्याच्या प्रेमात मग्न झाले पाहिजे. त्याच्या दोषाकडे लक्ष देऊ नका. ते माझ्यावर सोपवा. आपण ध्यानात बसल्यावर आपणास कळून येईल की अशाप्रकारे आशीर्वादाचे कारंजे आपणावर वर्षाव करू लागेल.

११ सहजयोगी पालकांची मोठी जबाबदारी असते, की त्यांनी त्यांच्या सहजयोगी पाल्याची देखभाल ठेवावयास हवी. त्यांचे संरक्षण करणे, शिस्त लावणे व प्रेममय वातावरणात त्यांची उन्नती करणे, जागृती मिळवलेले विद्यार्थी नकारात्मक विचार सहन करू शकत नाही. ते त्यांचा चांगल्या तऱ्हेने मुकाबला करीत असतात.

१२ मी सामुदायिक चेतनेमध्ये हे सर्व कार्य करीत असते,मी एकावर उपचार करून त्याला बरा केला, की तशा प्रकारचे इतर सहजयोगी आपोआप बरे होतात.

---

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥


# म्युझिक प्रोग्राम, ९ डिसेंबर २००६, प्रतिष्ठान













# म्युझिक प्रोग्राम, निर्मलनगरी, डिसेंबर २००६















